




दैनिक


# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : २२, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०६ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056







## गणेश विसर्जनच्या पूर्वसंध्येला पुण्यात गँगवॉर !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, पुणे :** गणेश विसर्जनच्या पूर्वसंध्येला पुण्यात टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळतोय. पुण्यातील नाना पेठत परिसरात गँगवॉररची घटना घडली. हल्लेखोरांनी तरुणावर तीन गोळ्या झाडल्या असून त्याचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. गोळ्या झाडून खून झालेला तरुण म्हणजे गणेश कोमकरचा मुलगा गोविंद कोमकर असल्याचे स्पष्ट झाले आहे. गणेश कोमकर हा एक वर्षापूर्वी झालेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी होता. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

विशेष म्हणजे नुकतंच पोलिसांनी हे टोळीयुद्ध उधळून लावलं होतं. पण तरीही गुन्हेगारांना रोखण्यात पोलिसांनी यश आलं नाही. पुण्यात एकीकडे गणेशोत्सवाचा उत्साह आहे. उद्या गणेशोत्सवाचा शेवटचा दिवस आहे. उद्या मानाच्या गणपतींच्या विसर्जन मिरवणुका शहरातून निघतील. असं असताना पुण्यातील नाना पेठेत एका तरुणावर तीन गोळ्या झाडल्याचा प्रकार



समोर आला आहे. या गोळीबारात तरुणाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक वर्षापूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकाच्या खुनाच्या प्रकरणातील आरोपीच्या मुलाचा खून करण्यात आला आहे. या घटनेमुळे पुण्यात एकच खळबळ उडाली आहे.

**पोलिसांनी नुकताच हत्येचा डाव उधळलेला...**

विशेष म्हणजे पुणे पोलिसांनी नुकताच हत्येचा डाव उधळला होता. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची एक वर्षापूर्वी हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी रविवारी तयारी करण्यात आली होती. पण पोलिसांना याबाबत माहिती मिळाली होती. त्यामुळे पोलिसांनी वॉच ठेवणाऱ्यांच्या मुसक्या आवळत अटक केली होती. पण त्याचे इतर साथीदार पळून जाण्यात यशस्वी ठरले होते. हत्येचा कट रचणारा मुख्य सूत्रधार पोलिसांच्या हाती लागला नव्हता. पोलीस त्याचा शोध घेत होते. या दरम्यान, आज हत्येची घटना घडली. पोलिसांकडून उद्याच्या गणेशोत्सवाची तयारी केली जात आहे. असं असताना नाना पेठेत अचानक हत्येची घटना घडली. आता या प्रकरणातील आरोपींचा शोध घेणं हे पुणे पोलिसांपुढे आव्हान असणार आहे.

**'या' दोन टोळ्यांमध्ये वैर शिगेला...**

पुण्यात गुंड बंडू आंदेकर टोळी विरुद्ध सूरज ठोंबरे टोळी असं वैर वाढलं आहे. हा संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासूनचा आहे. आंदेकर टोळीने २०२३ मध्ये ठोंबरे टोळीचे शुभम दहिभाते आणि निखिल आखाडेवर नाना पेठेत हल्ला केला होता. या हल्ल्यात निखिल आखाडेकर याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे ठोंबरे टोळीत संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे त्याचा बदला घेण्यासाठी ठोंबरे टोळीने आंदेकर टोळीचा 'बॅकबोन' म्हणून ओळख असलेल्या माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या केली होती. नाना पेठेतील तालीम परिसरात वनराज यांची हत्या करण्यात आली होती. त्यांच्या हत्येचा बदला घेण्याचा प्रयत्न नुकताच रविवारी करण्यात आला होता. पण आरोपींचा तो डाव फसला होता. पण आज पोलीस गणपती विसर्जनासाठी कामात व्यस्त असल्याची संधी साधत आरोपींनी डाव साधला. या हल्ल्यात तरुण मुलाचा मृत्यू झाला आहे.

## गणेश विसर्जनानिमित्त 'हे' १७ रस्ते बंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, पुणे :** गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्या, शनिवारी (सहा सप्टेंबर) लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, केळकर रस्त्यांसह प्रमुख १७ रस्ते वाहतुकीसाठी बंद राहणार आहेत. शनिवारी सकाळी सातपासून दुसऱ्या दिवशी मिरवणूक संपेपर्यंत या रस्त्यांवरील वाहतूक बंद राहणार आहे. त्यामुळे वाहनचालकांनी पर्यायी रस्त्याचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

गणेश विसर्जन सोहळ्यासाठी वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांसह ७०० पोलिस कर्मचारी व होमगार्ड वाहतूक नियोजन करणार आहेत. वाहतुकीसाठी बंद असणारे रस्ते मिरवणुकीची सांगता झाल्यानंतर वाहतुकीसाठी खुले करून दिले जाणार आहेत.

**वाहतुकीसाठी बंद असणारे रस्ते...**

शिवाजी रस्ता, लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता, कुमठेकर रस्ता, गणेश रस्ता, टिळक रस्ता, केळकर रस्ता, शास्त्री रस्ता, जंगली महाराज रस्ता (झाशीची राणी चौक ते खंडुजीबाबा चौक), कर्वे रस्ता (नळस्टॉप चौक ते खंडुजीबाबा चौक), ना. गोपाळ कृष्ण गोखले रस्ता (खंडुजीबाबा चौक ते फग्युसन महाविद्यालय प्रवेशद्वार), भांडारकर रस्ता (पीवायसी जिमखाना ते गोखले स्मारक चौक), पुणे-सातारा रस्ता (व्होल्गा चौक ते जेधे चौक), सोलापूर रस्ता (ढोले पाटील चौक-सेव्हन लव्हज चौक ते जेधे चौक), प्रभात रस्ता (डेक्कन पोलिस ठाणे; तसेच शेलारमामा चौक), बगाडे रस्ता (सोन्या मारुती चौक ते फडके हौद चौक), गुरुनानक रस्ता (देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक ते गोविंद हलवाई चौक).

**गणेश विसर्जनाच्या दिवशी उपलब्ध असणारे पार्किंग**

शिवाजी आखाडा वाहनतळ : दुचाकी / चारचाकी
नीलायम टॉकीज : दुचाकी
एआयएसएसजीएमएस मैदान दुचाकी / चारचाकी
संजीवनी वैद्यकीय महाविद्यालय मैदान दुचाकी / चारचाकी
स. प. महाविद्यालय : दुचाकी / चारचाकी
फर्ग्युसन महाविद्यालय : दुचाकी / चारचाकी
पेशवे पार्क सारसबाग दुचाकी, पाटील प्लाझा पार्किंग : दुचाकी
जैन हॉस्टेल बीएमसीसी रोड मैदान दुचाकी / चारचाकी
मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज : दुचाकी
दांडेकर पूल ते गणेशमळा : दुचाकी नदी पात्र
भिडे पूल ते गाडगीळ पूल : दुचाकी / चारचाकी
गणेशमळा ते राजाराम पूल : दुचाकी

## गणेशोत्सव कृत्रिम तलाव दिशाभूल कारभाराला आळा



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०५, मुंबई :** कै.दत्ताजी साळवी क्रीडांगण, भटवाडी, घाटकोपर (प.) येथे बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या वतीने साकारलेल्या गणेश विसर्जन तलावाच्या निर्मितीचे श्रेय लाटणाऱ्या विरुद्ध सहाय्यक महानगरपालिका आयुक्त तसेच उपायुक्त यांच्याकडे भटवाडी विभागातील सर्वपक्षीय एकत्रित येऊन तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यावर तातडीने कारवाई करण्याची प्रशासनाने आदेश दिले.

मुंबई मध्ये खूप सारे कृत्रिम तलाव उभारले गेले आहे ते सर्व तलाव सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती यांच्या माध्यमातून उभारले गेले आहेत.परंतु स्थानिक लोकप्रतिनिधी अनेक वर्षांपासून आपल्या नावाचा झेंडा व बॅनर लावून तसेच आगामी येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी हा तलाव आपण स्वतः बांधला आहे असे जनतेला दाखवून सर्व श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे विधानसभा निरीक्षक घाटकोपर (प.) चे निलेश नामदेव जंगम यांनी सहाय्यक आयुक्त व उपायुक्त 'एन विभाग' घाटकोपर (प.)यांना पत्राद्वारे स्थानिक प्रतिनिधी यांचे बाबत तक्रार अर्ज केला आहे.गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलाव बांधण्यात आलेला आहे माजी नगरसेवक यांच्याकडून आगामी महानगरपालिका निवडणूक लक्षात घेऊन स्वतःच्या जाहिराती करून सदर तलाव महानगरपालिका नाही तर स्वतः मार्फत बांधण्यात आले आहे असे दर्शविले जात आहे. विभागातील सामान्य गणेश भक्तांची फसवणूक केली जात आहे.अशा प्रकारचे निवेदन या पत्राद्वारे करण्यात आले आहे. विभागातील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शाखा क्रमांक १२८ चे अनेक पदाधिकारी तसेच गणेश आडकर, संगिता वर्पे (भाजपा) तसेच समाजसेवक वैभव आवटे पाटील आदी मान्यवरातर्फे महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊन योग्य ती कारवाई करावी असे सांगण्यात आले.

## जिथे दहशत माजवली; तिथेच पोलिसांकडून गुंडांचा करेक्ट कार्यक्रम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, नागपूर :** पैशांच्या किरकोळ वादातून शांतीनगर परिसरात बुधवारी रात्री शस्त्रांनी सुसज्ज गुंडांनी केलेल्या तांडवामुळे परिसरात भीतीचे सावट पसरले होते. एनआयटी गार्डनजवळ या टोळक्याने २० पेक्षा जास्त दुचाकी व चारचाकी वाहनांची तोडफोड केली. परंतु पोलिसांनी तातडीने कारवाई करत काही तासांतच १७ आरोपींना ताब्यात घेतले आणि त्यांची धिंड काढून नागरिकांसमोर उभे केले. या कारवाईमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबाबत विश्वास वाढला असून गुंडगिरीविरोधात ठोस संदेश गेला आहे.

ही घटना बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. शैलेश नावाच्या एका तरुणाचा पैशांच्या वादावरून काही युवकांशी वाद सुरू होता. वाद वाढताच आरोपींनी शैलेशवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र उपस्थित लोकांनी मध्यस्थी करून मारहाण थांबवली. त्यावेळी आरोपींनी पाहून घेऊ अशी धमकी देत घटनास्थळ सोडले. काही वेळातच सुमारे १५ ते २० जण पुन्हा तलवारी, लाठ्या घेऊन घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शैलेशचा शोध घेतला, पण तो न मिळाल्याने रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर दगडफेक व तोडफोड सुरू केली. काही मिनिटांतच २० हून अधिक वाहनांचे नुकसान झाले. आरडाओरड व दहशत निर्माण करणाऱ्या या कृतीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले.

यावेळी परिसरात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम व महाप्रसाद वितरण सुरू होते. अचानक झालेल्या गोंधळामुळे नागरिक घाबरून गेले. महिलांमध्ये व ज्येष्ठांमध्ये भीती निर्माण झाली आणि काहींनी सुरक्षिततेसाठी घरांचा आश्रय घेतला. नागरिकांनी तात्काळ पोलिसांना कळविले. माहिती मिळताच पोलीस उपायुक्त राहुल



मदने, शांतिनगर पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि क्राइम ब्रांचचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अल्पावधीतच १७ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. नागरिकांचा विश्वास परत मिळवण्यासाठी पोलिसांनी आरोपींना घटनास्थळावर आणून त्यांची परिसरात धिंड काढली. या मुळे पीडितांना आरोपींची ओळख पटवणे सोपे झाले आणि लोकांनी थेट त्यांच्याविरुद्ध तक्रारी नोंदवल्या.

नागपूर शहरात गुंडगिरी सहन केली जाणार नाही असा स्पष्ट संदेश पोलिसांनी या कारवाईदरम्यान दिला. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांनी घटनेला गंभीर मानून आरोपींवर कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी नागरिकांना घाबरून न जाता पोलिसांना सहकार्य करण्याचे आणि योग्य माहिती देण्याचे आवाहन केले.

## खळबळजनक! कळवणच्या आश्रमशाळेतील ५१ विद्यार्थिनींची तब्येत बिघडली...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, कळवण :** तालुक्यातील कनाशी आदिवासी आश्रम शाळेतील तब्बल ५१ विद्यार्थिनी अचानक अस्वस्थ झाल्याने खळबळ उडाली. उलट्या, ताप, जुलाब व अंगशिथिलपणा अशी लक्षणे दिसून आल्याने अन्नातून विषबाधा किंवा दूषित पाण्यामुळे असा प्रकार झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. सर्व विद्यार्थिनींवर कनाशी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू असून, त्यापैकी पाच विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, इतर विद्यार्थिनींना उपचारानंतर प्रकृती स्थिर असल्याने आश्रशाळेत पाठविण्यात आल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

कळवण प्रकल्पातील आश्रम शाळांना दररोजचे जेवण बागलाण



तालुक्यातील दहिदुले येथील 'सेंट्रल किचन'मधून पुरवले जाते. या किचनमधूनच दळवट आश्रमशाळेतील दोन विद्यार्थिनींना दोन दिवसांपूर्वी असाच त्रास झाला होता. त्यानंतर कनाशी येथील आश्रम शाळेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थिनींना त्रास झाल्याने अन्न पुरवठ्याचा दर्जा निकृष्ट असल्याचा संशय नागरिक व पालकांनी व्यक्त केला. येथील पुरवठा तातडीने बंद करून जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

घटनेची माहिती मिळताच

### विषबाधा झाल्याचा संशय...


आमदार नितीन पवार यांनी तत्काळ कनाशी प्राथमिक आरोग्य केंद्रात जात विद्यार्थिनींची विचारपूस केली. आवश्यक औषधे व उपचार तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य यंत्रणेला दिल्या. त्यानंतर त्यांनी प्रकल्प अधिकारी अनुकुरी नरेश यांच्याशी संपर्क साधून चौकशीचे आदेश दिले.

प्राथमिक तपासणीत अन्नातून विषबाधा किंवा दूषित पाण्यामुळे त्रास झाल्याचा संशय डॉक्टरांनी व्यक्त केला असून, गंभीर विद्यार्थिनींना पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्याची तयारी सुरू आहे. अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठवले असून अहवाल प्रतीक्षेत आहे.

**आश्रमशाळेतच व्यवस्थेच्या सूचना...**

चार-पाच दिवसांपासून या आश्रमशाळेतील १५ ते २० मुलींना अचानक पोटदुखी, जुलाब, मळमळ, ताप, सर्दी, खोकला यासारखा त्रास होत असून, गुरुवारी मुलींच्या संख्येत वाढ होऊन ५१ मुलींना त्रास झाला. १ सप्टेंबरपासून दहिदुले येथील स्वयंपाकगृहातून भाजी, वरण, भात या अन्नपदार्थांचा समावेश असलेले जेवण पुरविण्यात येत होते. आता तो पुरवठा बंद करून कनाशी आश्रमशाळेतच नाश्ता व भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचना प्रकल्प अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांना केल्या आहेत.

# संपादकीय



## चीन, रशिया, भारत यांची युती

चीनच्या शांघाय शहरात नुकतीच एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद पार पडली. या शिखर परिषदेत अनेक राष्ट्रांचे प्रमुख उपस्थित होते मात्र सर्वांचे लक्ष होते ते जिनिपिंग, पुतिन आणि मोदी या चीन, रशिया आणि भारत या देशांच्या राष्ट्र प्रमुखांकडे. जिनिपिंग, पुतिन आणि मोदी हे तीन नेतेच या शिखर परिषदेत केंद्रस्थानी होते त्याचे कारणही तसेच होते अमेरिकेने भारत आणि चीनवर टाकलेल्या टॅरीफ बॉम्ब नंतर होणारी ही पहिलीच शिखर परिषद होती. चीन आणि भारतावर टाकलेल्या टॅरीफ बॉम्बमुळे चीन आणि भारताचे अमेरिकेशी असलेले संबंध बिघडले आहेत तर रशियाने युक्रेनशी सुरू असलेले युद्ध थांबवावे यासाठी पुतिन आणि ट्रम्प यांच्यात झालेली बैठक फिस्कटली त्यामुळे या दोन्ही देशात देखील तणाव निर्माण झाला त्या पार्श्वभूमीवर ही शिखर परिषद खूप महत्वाची मानली जात होती. अमेरिकेला शह देण्यासाठी ही परिषद आयोजित केली असे मानले जात होते त्यामुळे या शिखर परिषदेतून अमेरिकेला कोणता इशारा दिला जाईल याकडे जगाचे लक्ष लागले होते तसा इशारा या शिखर परिषदेतून अमेरिकेला दिलाही गेला. भारत, चीन आणि रशिया हे तिन्ही देश एकत्र आल्याचे या निमित्ताने जगाने पाहिले. भारत आणि रशिया यांची मैत्री तर जगजाहीर आहे आता भारत आणि चीन यांचे देखील संबंध सुधारत आहे. जर हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेला शह देतील असा इशारा या निमित्ताने दिला गेला आणि तो अमेरिकेपर्यंत पोहचला देखील म्हणूनच या शिखर परिषदेनंतर अमेरिकेने भारतावर टीका केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड टीम यांचे व्यापार विषयक सल्लागार आणि भारताचे विरोधक असलेले पीटर नवारो यांनी शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने मोदी, पुतिन आणि जिनिपिंग यांची झालेली भेट त्रासदायक असल्याचे म्हटले आहे. भारताने चीन आणि रशिया सोबत नव्हे तर अमेरिका, युक्रेन आणि युरोप सोबत असायला हवे असे त्यांनी म्हटले आहे. पीटर नवारो यांच्या या वक्तव्यातून भारताने रशिया आणि चीनशी केलेली युती अमेरिकेच्या मर्मावर बोट ठेवणारी ठरली हे स्पष्ट झाले. नवारो यांच्या या वक्तव्यातून शांघाय शिखर परिषदेचा हेतू सफल झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारत, चीन आणि रशिया हा त्रिकोण तयार झाल्यास अमेरिकेलाच त्याचा सर्वाधिक त्रास होईल असे जाणकारांनी याआधीच सांगितले आहे. संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या माजी राजदूत असलेल्या निकी हॅले यांनी आधीच असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांना दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. आज भारत, रशिया आणि चीन एकत्र येत आहे त्याचा अमेरिकेला पोटशूळ झाला आहे पण याला तेच जबाबदार आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे आपल्या हेकेखोर स्वभावामुळे अमेरिकेलाच अडचणीत आणत आहे काही कारण नसताना ट्रम्प यांनी भारत आणि चीनवर भरमसाठ टॅरीफ लावले. भारत आणि चीनने विनंती करूनही ट्रम्प यांनी ते कमी केले नाही. त्यांना वाटले भारतावर टॅरीफ लावल्याने भारत झुकेल आणि ट्रम्प सांगेल तसे वागेल. कोणाचे कोणावाचून अडत नाही, प्रत्येक गोष्टीला पर्याय असतो हे ते विसरले. भारताने पर्याय शोधला आणि मग अमेरिकेला जाग आली. आता नवारो म्हणतात मोदींबद्दल माझ्या मनात खूप आदर आहे. मला भारतीय लोक खूप आवडतात. आज मोदी आवडतात म्हणणारे नवारो काही दिवसांपूर्वी मोदी आणि भारतावर टीका करत होते. वास्तविक भारताने अमेरिकेला कायम मित्र मानले. पंतप्रधान मोदी तर ट्रम्प यांना जाहीरपणे माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असे म्हणत असे पण डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या हेकेखोर स्वभावामुळे भारतासारखा मित्र गमावला. केवळ भारतच नाही तर भारतासारख्या अनेक देशांवर टॅरीफ लावून अमेरिकेने दुखावले आहे. भविष्यात ते देखील अमेरिके विरुद्ध एकत्र आले तर आश्चर्य वाटायला नको. ट्रम्प यांच्या या आताताई भूमिकेचा अमेरिकेचे नागरिकही निषेध करत आहे. एकदा नव्हे तर दोनदा ट्रम्प यांच्या धोरणाविरुद्ध अमेरिकन नागरिक रस्त्यांवर उतरले होते मात्र त्यातूनही ट्रम्प यांनी काही धडा घेतला नाही. त्यांच्या आताताई धोरणामुळे चीन, रशिया, भारत असा नवा त्रिकोण तयार झाला. हा त्रिकोण जर मजबूत झाला तर भविष्यात अमेरिकेला नक्कीच शह देईल यात शंका नाही.

# हैदराबाद गॅझेटीअर संदर्भाने जीआर तर निघाला... आमचं काय?

## संशय खरा तर ठरत नाही ना ?

**ओबीसी आरक्षण भाग : ०३**

हैदराबाद गॅझेटिअरचा संदर्भ घेऊन कुणबी प्रमाणपत्र संदर्भात महाराष्ट्र शासनाने जीआर काढला. हा मराठ्यांचा विजय की ओबीसींचा पराजय हे निश्चित अजून समजलेले नाही.

ओबीसी बांधव जीवाच्या आकांताने आम च्या आरक्षणामध्ये वाटेकरी नको, हे सांगत असतानाही हैदराबाद गॅझेटिअरच्या अनुषंगाने कुणबी नोंद असलेल्या मराठा बांधवांना

प्रमाणपत्र देण्याबाबतचा जीआर शासनाने काढून मराठा आंदोलनात शांत केलेले आहे. मनोज जरंगे ह्या जीआर ची प्रत घेऊन विजयी पताका मिरवत मुंबई बाहेर पडले. दुसऱ्या अंगाने विचार केल्यास, हा राज्य शासनाचा विजय असेल पण ओबीसींचा पराजय असे मात्र व्हायला नको.

ओबीसींच्या आरक्षणासंदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे ओबीसींच्या आरक्षणामध्ये राज्य पातळीवर इतर कोणत्याही प्रवर्गाला समाविष्ट करता येणार नाही, इतके स्पष्ट केलेले असतानाही हा जीआर कशासाठी किंवा कशा पद्धतीने काढला हा अभ्यासाचा विषय आहे. हा जीआर मराठी बांधवांना ज्यांच्या नावावर कुणबी नोंदी आहेत त्यांना प्रमाणपत्र देणे इतपर्यंतच मर्यादित असतील असे आज तरी वाटते. अत्यंत बारकाईने विचार केल्यास ओबीसी आरक्षणासाठीचा धोका काठावर येऊन थांबलेला आहे. राजकारणाला आणखी काही फाटे फुटल्यास तुम्हाला धोका देणे अवघड नाही. याची ओबीसी समाज बांधवांनी नोंद घ्यावी.

कालच ओबीसी बांधवाना आपले आरक्षण सुरक्षित ठेवण्यासाठी जागरूक राहिले पाहिजे असे सांगितले होते. अनेक ओबीसी नेते यादृष्टीने आपापले म्हणणे मांडत होते व आपण आरक्षणाबाबत सुरक्षित आहोत अशा दृष्टीने आपले मत नोंदवत होते. तथापि आजचा जीआर ची थप्पड नक्की कुणाला हाही विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ओबीसी बांधव न्यायालयामध्ये धाव घेणार हे सरकारने बहुदा अपेक्षित केलेले आहे. नागपूरला उपोषणाला बसलेले ओबीसी बांधव आपले उपोषण कायम चालू ठेवणार असे सांगत आहेत. ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे ओबीसींच्या आरक्षणामध्ये म राठ्यांचा समावेश होण्यास सुरुवात झाली असे म्हणत आहेत. तर अड. ससानेसर गॅझेटीयरचा दाखला देऊन यातून काहीही निष्पन्न होणार नाही असे सांगत आहेत. तर भुजबळ साहेब सर्वांना आवाहन करत आहेत की तुम्ही तुमची उपोषणे सोडून शासनाकडे तुमच्या तक्रारी नोंद करा व न्यायालयीन लढाई सुरू करा.

हे नक्की काय चालले आहे हे सर्वसामान्य माणसाला समजण्याच्या पलीकडचे आहे. कायदेतज्ञ याबाबत अभ्यास करतील व पुढची पावले टाकतील तथापि तोपर्यंत सर्वसामान्य ओबीसी मात्र द्विधा मनस्थितीत राहील हे निश्चित.

आजच ओबीसी आरक्षण वाचवा या संदर्भातले निवेदन माननीय चंद्रशेखर बावनकुळे साहेब महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना संस्थेमार्फत देण्यात आले. शासनाला याबाबतच्या ओबीसींच्या भावना सम जण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी यांच्या मार्फत देखिल निवेदन सादर करण्यात आले. यातील तीव्रता अधोरेखित करण्यासाठी या निवेदनाची प्रत माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनाही पाठविण्यात आली.

आमचे ओबीसींचे आरक्षण सुरक्षित ठेवावे. त्यातील वाटा कोणालाही देण्यात येऊ नये, अशी कळकळीची विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

ओबीसी बांधवानी या संदर्भात आपण काय करावे? अशा द्विधा मनस्थिती मध्ये आहे.सर्वसामान्य समाज बांधव यामध्ये आज प्रत्यक्ष काही करू शकत नाही, ही वस्तु स्थिती आहे. परंतु सामाजिक संघटनांनी शांत न राहता आपापली निवेदने जिल्हा पातळीवर तालुका पातळीवर तातडीने त्या त्या अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक आहे.

सर्वसामान्य माणसाने मात्र ज्या दिवशी आवश्यकता पडेल त्या दिवशी एकत्र येणे, आपली ताकद दाखवणे, गरजेचे आहे याची फक्त नोंद घेऊ नका ही खुणगाट मनाशी बांधा. ओबीसी बांधवा तू जागा हो. सावध राहा. असे हे जाहीर अहवान करण्यात येत आहे.

✻ आपला ✻
इंजि. राम पडघे
(अध्यक्ष)
श्री संताजी शैक्षणिक व
सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र

# भुजबळांचे नाराजीनाट्य महायुतीमध्ये ठिणगी...

मराठा आरक्षणाचा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकारणातील एक संवेदनशील आणि निर्णायक मुद्दा आहे. अलीकडेच मनोज जरांगे यांनी मुंबईत केलेल्या आंदोलनाची फलश्रुती म्हणजे राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरच्या आधाराने मराठा समाजाला आरक्षणाचा मार्ग खुला करणारा शासन आदेश काढला. मात्र यावरुन महायुती सरकारमध्ये पहिली ठिणगी पडली. या ठिणगीचे स्वरूप इतके गंभीर ठरले की राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ओबीसी समाजाचे प्रखर आवाज आणि अनुभवी मंत्री छगन भुजबळ यांनी सरळ या निर्णयाला विरोध दर्शविला. त्यांच्या या भूमिकेने आरक्षणाच्या प्रश्नाला नवे वळण मिळाले आहे. छगन भुजबळ हे राजकारणातील ओबीसी समाजाचे प्रतिनिधी म्हणून गेल्या अनेक दशकांपासून ओळखले जातात. त्यांनी सामाजिक न्याय या तत्त्वाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर ते ठामपणे भूमिका घेत आले आहेत. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरील त्यांची भूमिकादेखील याच पार्श्वभूमीवर समजून घेणे आवश्यक आहे. शासनाने काढलेल्या आदेशात मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याचा मार्ग शोधला जात आहे आणि हाच मुद्दा भुजबळ यांच्या आक्षेपाचा केंद्रबिंदू ठरला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार कोणत्याही समाजाला एका जातीच्या प्रवर्गातून थेट दुसऱ्या जातीच्या प्रवर्गात टाकण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही. हे केवळ सामाजिकदृष्ट्या अन्यायकारक नाही तर कायदेशीरदृष्ट्याही टिकणारे नाही.

भुजबळ यांचा विरोध केवळ कायद्यापुरता मर्यादित नाही. हा प्रश्न थेट ओबीसी सम ाजाच्या अस्तित्वाशी निगडित आहे. जर मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात स्थान मिळाले तर नैसर्गिकच ओबीसींच्या आरक्षणातील हिस्सा कमी होईल. आधीच रोजगार आणि शिक्षणाच्या क्षेत्रात आरक्षणासाठी प्रचंड स्पर्धा असताना आणखी मोठा समाज त्यात घुसविणे हे इतर ओबीसींसाठी अन्यायकारक ठरू शकते. त्यामुळे भुजबळांनी घेतलेली भूमिका ही त्यांच्या समाजाच्या हक्कांचे रक्षण करण्याची आहे असे ठामपणे म्हणता येते. त्यांच्या या भूमिकेमुळे ते ओबीसींच्या नजरेत खऱ्या अर्थाने आपले नेते ठरत आहेत. तथापि भुजबळांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारेही अनेक



मुद्दे आहेत. ते राज्य सरकारचा भाग असूनही त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकणे हे गंभीर पाऊल आहे. सरकारचा एक घटक म्हणून अंतर्गत बैठकीत आपले मत नोंदवण्याऐवजी सार्वजनिक पातळीवर सरकारविरोधी भूमिका घेणे हे विसंगत वाटते. यामुळे ते आपल्या सोयीचे राजकारण करत आहेत हे स्पष्टपणे दिसते. दुसरे म्हणजे मराठा समाज हा राज्यातील सर्वात मोठा व प्रभावी मतदार गट आहे. त्यांच्याविरोधात इतक्या टोकाची भूमिका घेणे म्हणजे राजकीयदृष्ट्या धोक्याचे पाऊल ठरू शकते.

विधानसभा निवडणुकीत भुजबळांना त्याचा अनुभव आला आहे. इतकेच नाही तर या निवडणुकीत प्रचार करताना भुजबळांना




काही ठिकाणी गावबंदी करण्यात आली होती. हा विरोध अधिक टोकाचा झाला तर भुजबळ यांचे राजकीय अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. आज मराठा आरक्षण हा सम ाजाच्या स्वाभिमानाचा प्रश्न बनलेला असल्याने त्याला विरोध करणाऱ्यांवर थेट शत्रूत्वाची छाया पडू शकते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काही मतदारसंघ मराठाबहुल आहेत. अशा ठिकाणी भुजबळांच्या भूमिकेमुळे पक्षालाच तोटा सहन करावा लागण्याची शक्यता आहे.

भाजपने गेल्या काही वर्षांत ओबीसी समाजात आपली मुळे घट्ट करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु महाराष्ट्रात निर्णायक सत्ता मिळवण्यासाठी केवळ ओबीसी मते पुरेशी नाहीत. मराठा सम ाजाच्या पाठिंब्याशिवाय कोणत्याही पक्षाला स्थैर्य मिळणे कठीण आहे. जर भुजबळ वारंवार सरकारविरोधी आवाज उठवून मराठ्यांना चिथावणी देत राहिले तर भाजपचा संतुलनाचा खेळ बिघडेल. या परिस्थितीत सरकारसाठी सर्वात सोपा मार्ग म्हणजे भुजबळांना आतूनच आवर घालणे. त्यांना मंत्रिपद आहे सत्ता आहे, पण त्याच वेळी ते सत्तेत असूनही विरोधी भूमि केत दिसतात. त्यामुळे आगामी निवडणुकांपर्यंत त्यांना अधिक तोंड उघडू न देण्यासाठी दबाव टाकला जाईल असे चित्र आहे. निवडणुकीत सरकारला एकजूट दाखवणे महत्त्वाचे असल्याने भुजबळांना सार्वजनिक पातळीवर थंडावण्याची सक्ती होऊ शकते. तथापि भुजबळांचा स्वभावच असा आहे की ते टोकाची मते व्यक्त करतात, पण प्रत्यक्षात निर्णायक पाऊल उचलण्यात ते वेळ घेतात. आरक्षणाचा प्रश्न न्यायालयात नेण्याची घोषणा त्यांनी केली असली तरी निवडणुका पार होईपर्यंत ते प्रत्यक्ष याचिका दाखल करण्याची शक्यता कमीच आहे. कारण अशा कृतीमुळे थेट सरकारची प्रतिमा ढासळेल आणि त्याचा दुष्परिणाम सत्तेत असलेल्या सर्व घटकांना भोगावा लागेल. त्यामुळे भुजबळ केवळ राजकीय संदेश देण्यापुरते आक्रमक दिसतील, पण ठोस पावले निवडणुकांनंतरच उचलली जातील. निवडणुका संपल्यावर मात्र भुजबळ पुन्हा आपली भूमिका धारदार करतील. तेव्हा ते न्यायालयाचा दरवाजा ठोठावतील आणि मराठा आरक्षणाच्या निर्णयाला आव्हान देतील. त्यामुळे निवडणुकीपूर्वीचे त्यांचे वक्तव्य हे राजकीय दबाव टाकण्याचे साधन असून खरी लढाई निवडणुकीनंतरच रंगेल. यातून एक मोठे वास्तव उघड होते ते म्हणजे, महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षांना ओबीसी आणि मराठा या दोन्ही मोठ्या गटांना एकाचवेळी खूश ठेवणे जवळपास अशक्य झाले आहे. भुजबळांची टोकाची भूमिका हेच दाखवते की सत्तेत असूनही अंतर्गत विसंवाद वाढला आहे. निवडणुकांपर्यंत सरकार हा विसंवाद दडपून ठेवेल, पण त्यानंतर भुजबळांसारखे नेते पुन्हा सरकारसमोर मोठे आव्हान उभे करतील, यात शंका नाही.

**धन्यवाद....!!**

# निधन वार्ता



साखरी ता.पाटण येथील रहिवासी प्रा.आनंदराव धोंडीराम सावंत यांचे ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. सामाजिक, शैक्षणिक, व आध्यात्मिक क्षेत्रात त्यांचे योगदान होते. त्यांच्या पश्चात पत्नी मुले, मुली, सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे.

## आयोजन ..

जाणतात सानथोर
उत्सवांचे प्रयोजन
उत्साहाने सळसळे
करे सार्थ आयोजन

सांगता सोहळ्याची
करायचे परिमार्जन
कच-यास विल्हेवाट
अपूर्ण ते संमार्जन

भग्न मूर्ती अवशेष
वेचून करे विसर्जन
रोग नको वृध्दींगत
निर्माल्याचे संकलन

स्वच्छता महत्त्वाची
मुलांनाही आकलन
पुढाकार वृध्दही घेई
करती सार्थ संचलन

शुभकार्यां साथ देती
एक होई सकलजन
निमित्ते होई प्रबोधन
उत्साही ऑक्सिजन

जागरूकता आलेली
सर्वत्र दिसे परिवर्तन
उत्सव सर्वधर्मियांचा
मनात शुध्द आवर्तने

– हेमंत मुसरीक, पुणे
मो.९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२



क्लासिक मित्र मंडळ सेक्टर ४ गणपती दर्शन घेतले. गणेश भवार सोबत रीलस्टार अश्विनी भवार आणि आर्यन भवार



आमचे मित्र मिलिंद भोईर (उलवा) यांच्या घरच्या गणपतीचे दर्शन घेतले सोबत गणेश भवार आणि किशोर पाटील



आमचे मित्र शेकापचे माजी सरपंच श्री सुजित मोकळ (तरघर उलवे) यांच्या घरच्या गणपतीचे दर्शन घेतले गणेश भवार आणि किशोर पाटील



साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, टाकळी ढोकेश्वर,

ता.पारनेर, जि.अहिल्यानगर, येथिल गणपती बाप्पाचे मनोभावे दर्शन




निलेश वास्कर (मु. शिळगांव, जि. ठाणे) यांच्या घरचा बाप्पा



रविंद्र पाटील (मु. पो. दहिसर जि. ठाणे) यांच्या घरचा बाप्पा



नागो कुंभार (पडलेगांव (नव पाडा) जि. ठाणे) यांच्या घरचा बाप्पा




भास्कर हाशा म्हात्रे (नागांव ता. जी.ठाणे ) यांच्या घरचा बाप्पा



साधना आंबेकर (मु. शिळगांव, जि. ठाणे) यांच्या घरचा बाप्पा



योगेश फौजदार (मु.खार्डी, जि.ठाणे) यांच्या घरचा बापा



शिवा आलिमकर (मु. शिळगांव,जि.ठाणे) यांच्या घरचा बापा



रुपेश मुंढे (देसाई पाटील पाडा, जि.ठाणे) यांच्या घरचा बाप्पा




राज भोईर (घणसोली, म्हात्रे आळी, नवी मुंबई) यांच्या घरचा बाप्पा




पप्पू पावशे (काकडवडगांव, मलंगगड,जि.ठाणे) यांच्या घरच्या गौराई माता




गणेश सोरखादे (भालगांव, आंबरनाथ जि. ठाणे) यांच्या घरचा बाप्पा

# विसर्जनसमयी बाप्पाची तरुणांना प्रेमळ साद



मित्रहो ! आज माझ्या विसर्जन दिनी मला तुमच्या सोबत थोडं हितगुज साधायचं आहे. मागील वर्षी तुम्ही म्हटलं ना, गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या तुम च्या प्रार्थनेप्रमाणे मी दिलेल्या हाकेलाओदिला आणि भाद्रपदच्या चतुर्थीला विराजमान झालो. माझ्या येण्याअगोदर तुम्ही जय्यत तयारी केली. मला आईप्रमाणे मातीतून फक्त मला मातीतून घडवायला हवं होतं. परंतु हल्ली तुम्ही मला प्लास्टर ऑफ पॅरिस पासून घडवत आहात. काही काळ मी तेही मान्यही केलं,परंतु त्याचबरोबर तुम्ही मला तुमच्या अपेक्षापोटी आणि कदाचित इतर मंडळांसोबत तुलना करण्यासाठी अतिशय भव्य रूपात स्थापन विराजमान करत आहे.काही ठिकाणी तर पन्नास-पन्नास फुटापर्यंत भव्य मूर्ती बनवून मला विराजमान करण्यासाठी भव्य मिरवणूक काढून स्वागत करताहेत.हे सुद्धा मी मान्य केलं,परंतु मित्रांनो! एक सांगू, एवढं भव्य स्वरूपाचं रूप नकोय मला. आई पार्वतीचा बाळ गोजिरी रूपातच मी खूप छान शोभून दिसतो. मला तेच आवडतं,कारण मायेनं प्रेम करून घ्यायला मला खूप आवडतं.या भव्य रूपातून हल्लीच्या तुमच्या रहदारीच्या आणि मर्यादित जागेतून मला आगमनाला आणि विसर्जनाला अडचणी येतात रे! स्वागतसमयी आणि विसर्जन समयी तुम्ही डीजे लावताय.म न्य आहे. काळ बदलत चालला आहे. नवीन काहीतरी स्वीकारायला हवं. मलाही ते आवडेल परंतु, त्याचा कर्णकर्कश आवाजाने लहान बालकं आणि आपलेच वृद्ध आई-बाबा यांना त्यांच्या हृदयाला त्रास होतो. म्हणून मला तर असं वाटतं की, छान आपले पारंपरिकवाद्य ढोल-ताशाच्या गजरात माझे स्वागत केले, तर मला खूप आवडेल. माहितीये, त्याच्यासोबत बाबांच्या डमरूचा आवाजही मला खूप आवडतो. तुम्ही म्हणताच ना, डम डम डम डम डमरू वाजे, डमरूच्या तालावर बाप्पा नाचे तर नक्कीच मी तुमच्यासोबत नाचत नाचत येईल. पण मित्रांनोखरं सांगू या डीजेचाआवाज मला सहन होत नाही रे .!

मित्रांनो! तुम्ही मला घरो-घरी विराजमान केले.बाल गोपाळांनी छान सजावट केली. दररोज छान छान नैवेद्य खाऊ घातला. मला खूप आवडले. तुमच्या प्रेमाने मी स्वतःला विसरून गेलो की, मला तुमच्या सोबत फक्त दहा दिवसच थांबायचे आहे. तसा तर, मी संकटसमयी तुमच्या नेहमी सोबत आहे. कारण तुम्ही माझे भक्त नंतर परंतु त्याअगोदर प्राणप्रिय मित्र आहात.सखे आहात परंतु, एक सांगू, हल्ली मला या पृथ्वीवर का?कुणास ठाऊक? अस्वस्थ वाटतंय. काही गोष्टीचे दुःख होते. कारण मला विराजमान करण्यामागील तुमचा जो उद्देश होता. सर्वांनी एकत्रित यावं एकीतलं बळ दाखवावं. सगळ्यांनी गुन्या-गोविंदाने नांदावं. परंतु मला हे तर कुठेच जाणवलं नाही. तुम्ही जाती-जाती, धर्मा- धर्मामध्ये विभागले. एवढेच काय!सार्वजनिक मंडळा-मंडळामध्ये सुद्धा एकी दिसत नाही.मला गरीब-श्रीमंतीतही विभागून टाकले. भव्य मूर्ती,डेकोरेशनची भपके बाजी, याबरोबर आता तर मी नवीनचं ऐकलय, व्ही आय पी दर्शन. हे नेमकं काय? माझ्या दर्शनासाठी तासंतास उभा राहणारा भक्त,हा माझ्या दर्शनासाठी आसुसलेला असतो. कुणीतरी दिखाऊ भक्त येतो आणि त्याला तुम्ही प्रथम स्थान देता. का?कशासाठी? अरे तुम्ही सर्वजण माझ्यासाठी सारखेच आहात. वावरातून लूसलुसित, हिरवीगार दुर्वा घेऊन, एक जास्वंदाचे फुल आणि मला आवडणारा पदार्थ म्हणजे मोदक आणणारा माझ्यासाठी तेवढाच प्रिय आहे जेवढा हजारोंची देणगी देऊन बडेजावपणाची प्रोढी मिरवतो. मग सांगा मित्रांनो! दर्शनासाठी चा हा गरीब-श्रीमंतीचा भेदाभेद कशासाठी?

मित्रांनो! या काळात मोबाईल आणि पाश्चिमात्य अनुकरणातून तरुण-तरुणीचे वर्तन बिघडत चालले आहे. तरुण-तरुणी मद्यप्राशन करून, अश्लील गाणे लावून डान्स करत आहे. यामध्ये हल्ली तरुणी सुद्धा सहभागी होताना दिसून येत आहे. त्यांच्या अशा या नशेगिरीतून त्यांच्यावर अत्याचार होताना दिसून येत आहे. मित्रांनो! असे हे चित्र बघून खूप वाईट वाटतं. खूप मन दुखतं. हल्ली, येणे यामुळेच नकोसं वाटायला लागलंय. अश्लील गाण्यावर डान्स करणे. तोटके कपडे, अंग-प्रदर्शन करून नाच-नृत्य करणे. हे सण साजरे करण्यासाठीची फॅशन होऊन बसली आहे. मित्रांनो! त्याऐवजी सुंदर स्तोत्र पठण ठेवा.व्याख्यानें ठेवा. म हिला सशक्तिकरण्यासाठी मेळवे आयोजित करा. तरुण-तरुणी व्यसनाच्या आहारी गेले. त्यांच्यासाठी समुपदेशन, सल्लागार शिबिरे आयोजित करा. त्याचप्रमाणे हल्ली गंभीर समस्या म्हणून प्रदूषणाची समस्या जाणवते आहे. जशी की जल, वायू, भू-प्रदूषण यातून सृष्टीची हानी होताना दिसून येत आहे. ती कशी टाळता येईल त्यावर चर्चा करा.पर्यावरण वाचवण्यासाठी प्रयत्न करा. हे बघायला मला नक्की आवडेल.

मित्रांनो! तुम्हाला असं वाटतं ना की, मी पुढच्या वर्षी लवकर यावं म्हणून, मग माझं थोडंसं ऐकाल का? माझी पीओपीची भव्य मूर्ती बनवण्यापेक्षा छोटीशी गोजिऱ्या रूपातील मातीची मूर्ती बनवून मला विराजमान करा. कर्णकर्कश डीजे न लावता पारंपरिक वाद्यांनी आगमन व विसर्जन करा. व्हीआयपी दर्शन बंद करून सर्वांसाठी दर्शन खुले करा. दहा दिवसांच्या काळात अश्लील गाणे,डान्सचे आयोजन करण्याऐवजी, धर्म रक्षण, संस्कृतीची जोपासना कशी करता येईल यासाठी कार्यक्रम आयोजित करा. महिला सशक्ती करण, म हिलांवरील अत्याचार कसे थांबतील त्याचप्रम ाणे पर्यावरणाची हानी कशी कळेल? यासाठी व्याख्यानें आयोजित करा. मोबाईलच्या अतिवापरामुळे लयास चाललेल्या पिढीसाठी मार्गदर्शन तसेच शेतकऱ्यांसाठी कृषी-मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करा. या सर्व कार्यक्रम ातून येणाऱ्या पिढीसाठी खूप मोलाचे मार्गदर्शन मिळेल. मित्रांनो! तुमचं हे कौतुक बघण्यास मी आतुर राहील. तेव्हा मात्र, नक्कीच मी तुमच्यासाठी ढोल-ताशांच्या गजरात आणि डमरूच्या तालावर नाचत येईल. सुखी रहा. आनंदी रहा...!

**श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं. ९७६३२८२०७७**

## नवसाला पावणारा मासा बेलेवाडी चा राजा..!!

आजच्या परिस्थितीत लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या या गणेशोत्सवात किती गणेशोत्सव मंडळांना लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची आठवण येत असेल..? लोकमान्य जनजागृतीसाठी सुरू केलेल्या गणेशोत्सवातून समाजप्रबोधन व्हावे हा ही त्याचा उद्देश होता त्या अनुषंगाने काही सांस्कृतिक कार्यक्रम होत असत... लोकमान्य टिळकांच्या विचारांना उजाळा देणार...मासा बेलेवाडी च अष्टविनायक तरुण मंडळ तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर येथील 'नवसाला पावणारा मासा बेलेवाडीचा राजा'गणेशाची प्रतिष्ठापना करणारे उत्सव मंडळ गेली २८वर्षे गणेशोत्सवाची परंपरा मोठ्या उत्साहात जपत आहे. ही संस्कृती जपताना समाज आणि राष्ट्राला उपयुक्त ठरतील, असे अनेक बदल स्वीकारून मंडळाने एक वेगळा आदर्श गणेश भक्तांना दिला आहे. सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या या




मंडळाने आतापर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. मंडळातर्फे आतापर्यंत महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिर, योग शिबिर,रक्तदान शिबिर तसेच गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मान्यवरांची व्याख्याने, कीर्तन आयोजित करण्यात आली आहेत. सम ाज प्रबोधन करण्याचा वसा मंडळींने घेतला आहे कोल्हापूर कागल कापशी खोऱ्यातील उत्कृष्ट मंडळ म्हणून अष्टविनायक तरुण मंडळ उदयास येत आहे मंडळाची दखल घेऊन मंडळाला अनेक पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले आहे मराठी भक्ती संगीत सोंगी भजन कार्यक्रम ठेवण्यात येते. मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे मंडळाचा प्रत्येक सदस्यच हा अध्यक्ष..!!मूर्तीचे देखणे रूप हेच मंडळाचे खासियत.. गावच्या आजूबाजूच्या खेड्यातील नागरिक आपले नवस बोलण्यासाठी गणपतीला साकडे घालण्यासाठी येत असतात.अनंत चतुर्थी विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी मंडळ लाईट डॉल्बी चा वापर न करता पारंपारिक वाद्याच्या तालावर बाप्पाची विसर्जनाची सांगता करतात....!!

असा हा माझ्या गावचा नवसाला
पावणारा मासा बेलेवाडी चा राजा..!!

**- शिवाजी चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**

## अनंत चतुर्दशीसाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सज्ज

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५, कल्याण :** अनंत चतुर्दशीच्या दिवशी होणाऱ्या श्री गणेश विसर्जनाची जय्यत तयारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने पूर्ण केली आहे. विसर्जनाची प्रक्रिया सुरक्षित व सुरळीत पार पाडण्यासाठी महापालिकेच्या सर्व विभागांना कार्यरत करण्यात आले आहे.

महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत एकूण ७६ विसर्जन स्थळी जनरेटर, २४७५ हॅलोजन, ५५८ एलईडी, १०५ लाईटनिंग टॉवर बसविण्यात आले आहेत. तसेच ३८ प्रमुख लोकेशन्सवर २१२ सीसीटीव्ही कॅमेरे बसवून कडक नजर ठेवली जाणार आहे.

कल्याण परिसरातील नागरिकांसाठी ६५ विसर्जन स्थळे, तर डोंबिवली परिसरातील नागरिकांसाठी ६२ विसर्जन स्थळांची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय विसर्जन आपल्या दारी ही संकल्पना कल्याणमधील अ, ब, क, ड व जे प्रभागात आणि डोंबिवलीतील फ, ग, ह, आय व ई प्रभागात राबविण्यात येत आहे.

पर्यावरणपूरक विसर्जनासाठी सर्व ठिकाणी कृत्रिम तलावांची सोय करण्यात आली असून, ६ फुटांपेक्षा कमी उंचीच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत प्रभागनिहाय वैद्यकीय पथके व प्रमुख विसर्जन स्थळी रुग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. अग्निशमन विभागामार्फत बोट, तराफा, गोताखोर, लाईफबॉय व लाईफजॅकेटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विसर्जन स्थळी स्वच्छतेसाठी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत निर्माल्य कलश, डस्टबिन व म नुष्यबळाची व्यवस्था केली आहे. तसेच दुर्गाडी, मोठा गाव, कुंभारखान पाडा यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी अधिकारी वर्गाची नेमणूक करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार संपूर्ण विसर्जन प्रक्रिया सुरळीत व सुरक्षितपणे पार पडावी यासाठी प्रशासन सज्ज असून, नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा; राज्याचा ऐतिहासिक निर्णय

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, ठाणे :** राज्य शासनाने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे मत्स्यपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आता कृषी क्षेत्रातील सर्व सुविधा, योजनांचा लाभ आणि बँक कर्जासंबंधी सवलती मिळणार आहेत.

महाराष्ट्रात ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा असून, कोकण किनारपट्टीपासून विदर्भातील गोड्या पाण्यातील मत्स्यपालनापर्यंत लाखो कुटुंबे थेट मत्स्यव्यवसायावर अवलंबून आहेत. आतापर्यंत कृषी आणि मत्स्यव्यवसाय या दोन क्षेत्रांत वेगळे धोरणात्मक निकष असल्याने मच्छीमारांना अनेक सवलतींपासून वंचित राहावे लागत होते. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कर्ज, अनुदान, विमा संरक्षणाच्या योजनांचा लाभ मच्छीमारांना मिळत नव्हता.




### निर्णयाचे फायदे

**१. कर्ज सुविधा :**

मत्स्यपालकांना आता बँकांकडून कमी व्याजदराने कर्ज मिळणार आहे. यामुळे मत्स्यव्यवसायाचा विस्तार आणि आधुनिकीकरण शक्य होईल. किसान क्रेडिट कार्ड ही मच्छीमारांना मिळेल.

**२. शासकीय योजना व अनुदान :**

मत्स्यव्यवसायाला आता कृषी योजनांचा लाभ मिळेल. पायाभूत सुविधा उभारणी, शीतगृहे (कोल्ड स्टोरेज), मत्स्य प्रक्रिया उद्योग यासाठी शासन मदत करेल.

**३. विमा संरक्षण :**

हवामान बदल, चक्रीवादळे, पूर यामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी कृषी विम्यासारख्या योजनांत मच्छीमारांचा समावेश होणार आहे. तसेच अपघाती मृत्यू झाल्यास विमा योजना लागू असेल.

**४. तांत्रिक व संशोधन साहाय्य :**

कृषी विद्यापीठे, संशोधन केंद्रे आणि तांत्रिक संस्था मत्स्यपालकांना आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक मार्गदर्शन उपलब्ध करून देतील.

**५. रोजगार व निर्यात वाढ :**

ग्रामीण आणि किनारी भागात मत्स्य व्यवसायाशी निगडित प्रक्रिया उद्योग वाढीस लागतील. यामुळे स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध होईल आणि मत्स्य उत्पादन निर्यातीतून राज्याला परकीय चलन मिळेल.

या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून मच्छीमार समाजाला सामाजिक व आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल.

मत्स्यपालनाला कृषीशी समान दर्जा मिळाल्याने या व्यवसायाचा दर्जा उंचावेल.

या निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे महाराष्ट्रात जलशेती हा स्वतंत्र व टिकाऊ व्यवसाय म्हणून विकसित होण्याची शक्यता आहे. समुद्र किनारी मासेमारीबरोबरच गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाला नवी उभारी मिळेल. त्याचबरोबर ग्रामीण भागात शीतगृहे, मत्स्य प्रक्रिया उद्योग, निर्यात साखळी उभारली जाणार आहे.

मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा हा फक्त धोरणात्मक बदल नाही तर मच्छीमार समाजासाठी नवे पर्व आहे. शेतकरी आणि मच्छीमार यांच्यातील असमानतेची दरी मिटवून दोन्ही क्षेत्रांना समसमान सन्मान मिळवून देणारा हा निर्णय राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# थोडक्यात

## जी.आर विरोधात तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०५, मुदखेड (नांदेड) :** सकल ओबीसी समाजातर्फे सरकारने काढलेल्या जी.आर विरोधात शुक्रवार, दि.०५ सप्टेंबर २०२५ रोजी तहसीलदार मुदखेड यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले व शासनाने काढलेल्या जी.आर चा तीव्र निषेध करण्यात आला. या निर्णयामुळे मराठा समाजातील काही व्यक्तींना मराठा-कुणबी समाजाशी जोडून ओबीसी प्रमाणपत्र मिळवून देण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक, बेकायदेशीर व असंवैधानिक आहे.या निर्णयामुळे ओबीसी समाजातील सुमारे ४०० हून अधिक जातींच्या हक्कांवर गदा येणार असून त्यांना शिक्षण, नोकरी, राजकीय क्षेत्रात होणारे प्रतिनिधित्व गंभीर स्वरूपात घटणार आहे. सगे सोयरे किंवा सरसगट आरक्षणाचा निकष नसून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास हा आरक्षणाचा निकष आहे. या निकषानुसार मराठा समाज ओबीसी आरक्षणासाठी पात्र होतं नाहीये.दबावाला बळी पडून सरकारने जी.आर काढला असून जी.आर मुळे ओबीसीच्या आरक्षणात घुसखोरी होणार असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला.तरी आपण जो जी.आर काढला आहे तो त्वरित रद्द करावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली.

यावेळी माजी नगरसेवक कैलास गोडसे,गोविंद गोपनपल्ले,संजय आऊलवार, करीम खाँ साब,चांदू चमकुरे,भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण,प्रकाश बल्फवाड,पापाराव चव्हाण,पंकज पचलिंग,भगवान पानेवार,भीमराव महादवाड,प्रभाकर चंद्रे,कानोबा बिस्मिल्ले,योगेश खांडरे, कालिदास जंगीलवाड, गोविंद गुडमवार, विठ्ठल आचार्य, सचिन चंद्रे, माधव मेटकर,राहुल चव्हाण, राकेश हेमके, मारोती पानेवार, गजानन बोडके, माधव बोडके,संभाजी हामंद,गोविंद खांडरे, आकाश हामंद, हैबती संबोड, संतोष हामंद पत्रकार ईश्वर पिनलवार,रुखमाजी शिंदे,संतोष सावंत, अब्दुल रजाक आदींची उपस्थिती होती.

## पारनेर तालुक्यात वाढू लागले साथीचे आजार

# सर्दी, खोकल्याच्या रुग्णांमध्ये लहान मुलांची संख्या लक्षणीय

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** ढगाळ व रोगट हवामानामुळे नेवासा तालुक्यात सर्दी, खोकल्याचे रुग्ण वाढले आहेत. खासगी दवाखान्यांत रुग्णांची गर्दी दिसत आहे. सर्दी, खोकल्यांच्या रुग्णांमध्ये लहान मुलांची संख्या लक्षणीय असल्याने पारनेर तालुक्यात साथीचे आजार वाढू लागले.

सध्या पावसाळी ऋतू सुरू आहे, परंतु पाऊस पडण्याऐवजी फक्त ढगाळ वातावरण आहे. धड पाऊसही पडत नाही आणि ऊनही नाही, अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे डासांची उत्पती वाढली आहे. सर्दी, खोकला, ताप या आजारांनी डोके वर काढले असून, रोज शेकडो नागरिक आजारी पडत आहेत. पारनेर तालक्यात सध्या सर्दी व खोकल्याच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. अनेक ठिकाणी लहान मुलांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे.

सकाळी गार आणि दुपारी गरम असे वातावरण असल्याने लोक आजारी पडत आहेत. सर्दी, खोकला, ताप तर दर १० ते १५ दिवसांनी परत-परत येतो. सर्दी-खोकला झाल्यानंतर चार-पाच दिवसांमध्ये बरा होत नाही, तर तो १०-१५ दिवस रेंगाळतो. ताप येतो. डोकेदुखी, अंगदुखीदेखील असते. त्यामुळे परीक्षेच्या दिवसांत मुले आजारी पडत असल्याच्या तक्रारी घेऊन डॉक्टरांकडे जाणार्या पालकांचे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे.



यावर एक प्रभावी उपाय म्हणजे, औषध बदलून देणे, हा असल्याचेही तज्ज्ञ सांगतात. वातावरणात विषाणूजन्य आजारांचा संसर्ग वाढतो. असे विषम वातावरण वेगवेगळ्या विषाणूंसाठी पोषक असते. त्यामुळे सर्दी, ताप, खोकल्याचे रुग्ण वाढले आहेत. लहान मुलांमध्ये बदलत्या वातावरणाला प्रतिकार करण्याची क्षमता कमी असते. त्यातून ही मुले आजारी पडतात. सध्या तालुक्यात सर्दी व गोखल्यांच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. अनेक गावांमध्ये लहान मुलांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे. डॉक्टरांनी लोकांना विशेषतः लहान मुलांची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. ताप किंवा इतर लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांना भेटून तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा हे महत्त्वाचे आहे.

## तहसील कार्यालयाच्या अनागोंदी कारभारावर कारवाईची मागणी

## १५ सप्टेंबर ला नाशिक येथे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन छेडणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** अहिल्यानगर व पारनेर तहसील कार्यालयाच्या अनागोंदी कारभाराची अनेक वेळा तक्रार, उपोषण आणि आंदोलन करून देखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दखल घेतली जात नसल्याने अन्याय निवारण निर्मूलन समितीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा दिला आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी नाशिक येथे विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येणार आहे. पारनेर तालुक्यातील मौजे ढवळपुरी येथील गट क्रमांक ३११ व १८४ प्रकरणी दंडात्मक रक्कम अनुक्रमे ६९ लाख व ३ लाख ४५ हजार अशी असून, २ जुलै २०२५ रोजी आदेश झाल्यानंतरही महसूल अधिनियम १९६६ चे कलम १७६ व १८२ नुसार पुढील कारवाई करण्यात आलेली नाही.

मौजे म्हसणे सुलतानपूर येथील गट क्रमांक ३९ मध्ये अवैध मुरूम उत्खनन प्रकरणी ७२ लाख ४५ हजार रुपयांचा दंड उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदापारनेर यांनी शासन परिपत्रकाचा चुकीचा वापर करून शासनाकडे जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी माफ केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १०७९ अन्वये कारवाई करावी, अशी मागणी समितीने केली आहे.

पारनेर तालुक्यातील अनेक वीटभट्टी धारकांनी तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कमी रॉयल्टी दाखवून मातीचा मोठा साठा करून ठेवला आहे. मात्र, याबाबत पंचनामा करून दंडात्मक कारवाई जाणीवपूर्वक टाळली जात असल्याचा आरोप समितीने केला आहे. मौजे गटेवाडी येथील गट क्रमांक २०३ मध्ये फॉरेस्ट खात्यातील जमीन सरपंच व ठेकेदारांच्या संगनमताने रस्त्याच्या कामासाठी वापरली गेली. रॉयल्टी व परवानगी नसतानाही तहसील कार्यालयाने यावर कारवाई केली नाही. बाबुर्डी बेंद ते घोसपुरी या मार्गावर नियमबाह्य दुहेरी वाहतूक सुरू असून महसूल अधिनियमाप्रमाणे कारवाई अद्याप करण्यात आलेली नाही.

श्रीगोंदा तालुक्यातील निबवी गावातील बेक बॉयलर ॲण्ड ब्रँडिंग फार्मा मध्ये नियमबाह्य कारभार सुरू असल्याने अनेक वेळा तक्रारी व उपोषण झाले; मात्र कोणतीही दखल घेतली गेली नाही. तसेच पारनेर तालुक्यातील मौजे भाळवणी येथील गट क्रमांक ३७ पीएचपी पेट्रोल पंपासमोर शेडमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन करून मुरुमाची भर टाकण्यात आली. याचा फेरपंचनामा सार्वजनिक बांधकाम विभागाने करून, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा नियम ४८(७), ४८(८) नुसार दंडात्मक कारवाई तसेच भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या सर्व तक्रारींचा पाठपुरावा अनेक दिवसांपासून सुरू आहे. वारंवार निवेदने, उपोषण व आंदोलन करून देखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कारवाई होत नसल्याने संघटनेच्या वतीने संताप व्यक्त केला जात आहे. कारवाईस टाळाटाळ होत असल्याने आता विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहोत, असा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

# विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन वर्धापन दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त एक दिवसीय आयोजित भव्य रक्तदान शिबिरात १७४ रक्तदात्यांनी अमूल्य दान रक्तदान केले. उच्चांक १७४ रक्तपिशव्या संकलन करण्यात आयोजक टीमला आपल्या सर्वांच्या सहकार्याने, अथक परिश्रमाने आणि रक्तदात्यांनी दाखवलेल्या अमूल्य विश्वासामुळेच शक्य झाले. भविष्यात सुद्धा आपले सहकार्य, आशिर्वाद अवश्य आयोजकांच्या पाठीशी राहील हीच एकमात्र अपेक्षा. आपल्याला रक्ताची गरज लागल्यास अवश्य आम्हाला संपर्क साधा ती आम्ही पूर्ण करण्यास कटिबद्ध आहोत.

दिनांक ०४ सप्टेंबर प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या मनोरंजन केंद्र-२ येथे सकाळी १० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान शिबिराचे उदघाटन मुख्य अभियंता गिरीश कुमरवार यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष झोन अध्यक्ष संजीवकुमार गर्जे, प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, अधिक्षक अभियंता विलासकुमार उके, सहाय्यक महाव्यवस्थापक नितीन काळे, डॉ.मुकेश गजभिये वैद्यकीय अधिक्षक, गजानन सुपे, बापू देशमुख, शैलेंद्र अर्जितवार माजी केंद्रीय उपाध्यक्ष, विनोद हुड, प्रकाश परमार, माजी झोन पदाधिकारी, अशोक भागवतकर, पुरुषोत्तम साबळे आदि उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक मुख्य अभियंता गिरीश कुमरवार यांनी मनोगत व्यक्त करताना विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन ही तांत्रिक कर्मचारी यांचे नेतृत्व करीत असताना सुनियोजित पद्धतीने सामाजिक कार्यक्रम राबवून समाजाची सेवा करीत आहे. याबद्दल संघटनेचे कौतुक केले आणि संघटनेच्या प्रगतीकरीता त्यांनी शुभेच्छा दिल्या.रक्तदानाचे महत्त्व प्राचार्य रामकृष्ण टाले यांनी रक्तदान हे सर्वात श्रेष्ठदान असल्याचे समजावून सांगितले. त्यांनी आज आपल्या जीवनातील १११ वे रक्तदान केलेबापू देशमुख माजी केंद्रीय उपाध्यक्ष यांनी कठीण परिस्थितीत संघटना कशी उभी केली याचा वृत्तांत सांगितला. शैलेंद्र अर्जितवार यांनी संघटनेच्या कार्याची माहिती सांगितली.

वर्धापन दिनी कंठीराम शेंडे, प्रेमलाल लोधी यांचा सेवापूर्ती सत्कार करण्यात आला. योगेश कुळमेथे तंत्रज्ञ १ यांनी स्व:इच्छेने विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन मध्ये प्रवेश केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संजीवकुमार गर्जे यांनी संघटना दरवर्षी वेगवेगळ्या माध्यमातून कशा पद्धतीने सामाजिक बांधिलकी महाराष्ट्र भर जपत असते याची माहिती दिली सोबतच खापरखेडा च्या संपुर्ण टीम चे नियोजन बध्द वर्धापन दिनाचे औचित्य साधत विविध कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाबद्दल अभिनंदन केले. दिनांक ४ सप्टेंबर २०२५ ला संघटनेच्या ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते वार्तांफलक अनावरण, वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन, वर्धापन दीन सोहळा कार्यक्रमाला मोठ्या संख्येने वीज कामगार, कंत्राटी कामगार, अधिकारी वर्ग



व सामाजिक कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. रक्त संकलन गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज (GMC)नागपूर आणि जीवन ज्योती ब्लड बँक नागपूर यांनी केले.संघटना मागील ८ वर्षापासून रक्तदान शिबिराचा कार्यक्रम सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून, परिसरातील गरजूंना,अनाथांना, वेळेवर रक्ताची गरज भासल्यास उपलब्ध करीत सामाजिक बांधिलकी जपत आहे. या रक्तदान शिबिर कार्यक्रमाला दरवर्षी मोठ्या संख्येने रक्तदात्यांच्या उस्फुर्त प्रतिसादामुळेच रक्तसंकलनात अग्रेसर आहे.

सामाजिक क्षेत्रातील नामवंतांनी या रक्तदान शिबिराला प्रत्यक्ष भेट दिली त्यामध्ये ग्रामपंचायत सदस्य चिचोली, भानेगाव, पोटा, पत्रकार बंधु, सामाजिक कार्यकर्ते, सर्व मित्र संघटना व आजी माजी पदाधिकारी यांनी रक्तदान शिबिर सुरू असताना वेळोवेळी भेटी दिल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश डेहनकर, संचालन नंदकिशोर पाहुणे तर आभार विलास हिंगे यांनी मानले. रक्तदान शिबिर कार्यक्रमाला मोठ्या संख्येने संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

## कल्पना राऊत यांची जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड

**अक्षराज : स्वप्नील जावळे**



**दि.०५, खंडाळा (सातारा) :** शिक्षक दिनाच्या दिवशी ज्या शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. अशा शिक्षकांना जिल्हास्तरावर पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. त्यामध्ये खंडाळा तालुक्यातून जिल्हा परिषद शाळा बोरी च्या कल्पना राऊत यांची निवड करण्यात आली. सातारा जिल्हा परिषदेने 'सातारा प्राईड' या ऑनलाइन पोर्टलवर सन २०२५-२६ च्या जिल्हा आदर्श पुरस्कार निवडीची प्रक्रिया पूर्ण केली असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी दिली. याशनी नागराजन म्हणाल्या, आदर्श शिक्षक पुरस्कारामुळे शिक्षकांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळते. शिक्षकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन त्यांच्यामध्ये अधिक जोमाने काम करण्याची इच्छा निर्माण होते. सातारा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी जिल्हास्तरीय आदर्श शिक्षकांची निवड करून त्यांना सन्मानपूर्वक सदर पुरस्कार प्रदान केले जातात.

# मनमर्जी प्रमाणे कारभार करणाऱ्या ग्रामविकास अधिकारी यांचा जाहीर सत्कार सोहळा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** गेले अनेक वर्ष पाठपुरावा करूनही ग्रामपंचायत मधील कामे मार्गी लागत नाहीत. शामनगर परिसरात रस्ते व गटारीचे अर्धवट काम केल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पावसाच्या पाण्याचा तसेच सांडपाण्याचा व्यवस्थित निचरा होत नसल्याने ते साचून मच्छर तयार होतात व यामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येत आहे. आनंदनगर परिसरात लोकवस्ती जास्त असलेल्या भागात मोबाईल टॉवर आहे त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही ग्रामसेवक कोणतेही ठोस पाऊल उचलत नाहीत. गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर निर्णय घेण्याचा लेखी अधिकार दिला असूनही कोणतीही कारवाई ग्रामविकास अधिकारी राजेंद्र काळे साहेब यांच्याकडुन झालेली दिसत नाही.

अशा अनेक कामांमध्ये चालढकल पणा केल्याबद्दल ग्रामविकास अधिकारी राजेंद्र काळे यांचा जाहीर सत्कार मंगळवार दिनांक ९ सप्टेंबर २०२५ करण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे या कार्यक्रमासाठी देशाचे पंतप्रधान आदरनीय नरेंद्र मोदी साहेब यांना ही पत्राद्वारे निमंत्रण पाठवून उपस्थित राहण्यासंदर्भात विनंती करण्यात आली आहे. आनंदनगर गावातील सुज्ञ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, सर्व राजकीय पक्षाचे नेते, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार बांधव यांच्या उपस्थिती मध्ये सत्कारमूर्ती आदरणीय ग्रामविकास अधिकारी राजेंद्र काळे यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमासाठी सर्वांनी मंगळवार दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता, ग्रामपंचायत कार्यालय आनंदनगर ता.इंदापूर, जि.पुणे याठिकाणी उपस्थित रहावे असे आवाहन शशिकांत गेजगे यांच्याकडून करण्यात आले आहे.